# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/०३/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

**पोस्टे जलालखेडा हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कायदेशिर कार्यवाही**

आज दिनांक २१/०३/२०२४ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि सी. बी. चौहान, पोलीस उपनिरीक्षक पपीन रामटेके, पोलीस अंमलदार पुरूषोत्तम धोंडे, निलेश खरडे, संतोष क्षिरसागर, आशिष हिरूळकर, फिरोजशेख, शिवा सौदळे, व होमगार्ड सैनिकांच्या मदतीने पोलीस स्टेशन परिसरात विशेष मोहीमे दरम्यान सिक बेडा बानोर तसेच सिक बेडा रामठी येथे स्टॉफचे मदतीने दारूबाबत रेड करून ०२ महिला आरोपी व चंद्रु सुरेश पवार वय २८ वर्ष, रा. मालटेकडी यांचे वर दारूबंदी कायदा अंतर्गत एकुण ०३ गुन्हे नोंद करण्यात आले असुन एकुण १८५ लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती एकुण ९२५०/— रूपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला दारूबंदी कायद्यां अतर्गत गुन्हे नोंद करून सदर गुन्हयाचा पुढील तपास ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान यांचे मार्गदशर्नात निलेश खेरडे, फिरोज शेख हे करित आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष. ए. पोद्दार (पोलीस अधिक्षक सा. (नागपुर ग्रा.), मा.अपर पोलीस अधिक्षक सा. मा. उपविभागीय पोलीस अधि. सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. सी. बी. चौहान व त्यांच्या पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर